म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ६७५

REFBK-0019488
REFBK-0019488

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५९५

# अखंड सौभाग्य शृंगार.

REFBK-0019488
REFBK-0019488

किमत ८-

बा.कृ ...

मोवेझी रचाळोगने

नमस्कार वि.वि. रहदर हू

पुस्तक आपणाकडे भेटी

दाखल पाठविले आ

ती घ्यावी अवश्य। खे

र व्हावा व ऽपृ वे के बा

न पाहण्याची तसदी घे

वी कोण अशावा होते

आपला हितेच्छु

(ह) श्रमण सोनाजी पैल

हे उमारघार प.आ.-बा

ता. बाळाप

(५-२५)

बा. सं. का. ५
१०९

# प्रस्तावना.

हें एका पतीनें आपली प्रियभार्या पितृगृहीं असतां तिला लिहिलेलें एक पत्र आहे. पूर्वी यास "उपदेशामृत" असेंच नांव दिलें होतें, परंतु पत्र लिहून तयार झाल्यावर "अखंड सौभाग्यश्रृंगार" हेंही नांव याला चांगलें शोभेल असें वाटल्यावरून तेंच नांव देऊन तें पत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध केलें आहे, तरी प्रिय देश-बंधु-भगिनी हंसक्षीरन्यायानें या माझ्या अल्पकृतीचा स्वीकार करून कौतुक करतील अशी आशा आहे.

आपला,

ल. सो. प.

९०९

"श्रीगुरुदत्तसमर्थ."

# अखंड सौभाग्यशृंगार.

मुक्काम–व्याळें. तारीख १९ सप्टेंबर. इसवी सन १९०२.
अनेक आशीर्वाद—

## "ओंव्या."

आज तुजला उपदेशामृत । पाजावें हा धरोनी हेत । प्राणसखये पत्र लिहीत । होईं त्वरीत शाहणी तूं ॥ १ ॥ तूं शाहणी झाल्यावांचून । करणें संसार केवळ शीण । पशु पक्षी जलचर मीन । जन्ममरण न भोगिती कां ॥ २ ॥ काय नाहींत त्यांना विकार । काय ते न करिती आहार । आलस्य निद्रादि प्रकार । गुणसरिते त्या नसती कां ॥ ३ ॥ कर्ण चक्षु जिव्हा घ्राण । त्वचा रदन आणि वदन । स्पर्शास्पर्शादीक ज्ञान । नसतें काय राजसे त्यां ॥ ४ ॥ काय नाहींत त्यांना पाय । जीवनार्थ नाना उपाय । शीतोष्ण निवारणाची सोय । न करिती काय शुभानने ॥ ५ ॥ सार, मनुज आणि इतर जीव । यांत काय आहे भेदभाव । याचा जो विचार करील मानव । तोचि धन्य या संसारीं ॥ ६ ॥ मम-मन-मानस-मराळिके । गुण-सरिते चंपक-कलिके । पुढें सांगतों जीं वचनें निकें । तीं लक्ष देवोनी परिसावीं ॥ ७ ॥ पशु पक्षी आणि कीटक । यांहूनि मानव वेगळा देख । ईश्वरें बुद्धी देवोनि एक । श्रेष्ठ केला या लोकीं ॥ ८ ॥ त्यानें देवोनि बुद्धी मानवा । आपुला दाविला पूर्ण ठेवा । नाहीं तरी तो भवार्णवा । न जाता तरोनी सहसाही ॥ ९ ॥ घडिला नसता मानव

जरी । तरी परमेशा कोण विचारी । सृष्टी घडोनीयां सारी । व्यर्थ जाहली असती कीं ॥ १० ॥ ऐसा मानव जन्म थोर । ज्यांतें लाधला साचार । त्यांनीं करोनियां विचार । भव-सिंधू-पार जावें कीं ॥ ११ ॥ विचाराचें आदि स्थान । इभगमने आपुलें मन । त्यातें करूनियां स्वाधीन । कार्य करावें कोणतेंही ॥ १२ ॥ मन मीन मृग मयूर । जगत्जेता मदन वीर । हे पांचही युक्त मकार । चंचल अतितर बोलिलेती ॥ १३ ॥ त्यांतही मन बहुत श्रेष्ठ । करितांही अतितर कष्ट । स्वाधीन होय पूर्ण स्पष्ट । भगवंत गीतेंत बोलिले ॥ १४ ॥ मनाच्या जे स्वाधीन होती । तें करि-तसे तयांची माती । नरजन्म लाधोनि हातोहातीं । व्यर्थ जाती अधोगती ॥ १५ ॥ आज नको हा श्रेष्ठ विचार । कैसा करावा संसार । मन स्वाधीन ठेवोनि सारासार । तोचि प्रकार सांगतों ॥ १६ ॥ ह्मणशील प्रस्त मनाचें । कां वाढवितां एवढें साचें । तरी निराकरण तयाचें । करितों थोडें परिसावें ॥ १७ ॥ मम-मन-रंजन सुकुमारी । जीव जो आहे देहधारी । मन तयाचा कारभारी । संपूर्ण सत्ता त्या हातीं ॥ १८ ॥ देहनगरीचा जीव राजा । बुद्धी तयाची होय भाजा । कोणत्याही स्वतंत्र काजा । करू न शकती मनाविण ॥ १९ ॥ जैसा अंग्लदेशाधिपती । होय जरी महान नृपती । परी सत्ता पार्लमेन्टाहातीं । करील जें ती मान्य तया ॥ २० ॥ किंवा जहाज चाले सागरीं । सुकाण्या फिरवी आपुले करीं । तैसेंच चाले परोपरी । अन्यप्रकारीं वर्तेना ॥ २१ ॥ यासाठींच रामदासें जाण । उपदेश केला मनाकारण । मन हें केवळ मत्त वारण । विवेकांकुशें आवरावें ॥ २२ ॥ तरी मन होतांच स्वाधिन । इतर इंद्रियांचा केवा कोण । जैसें हातीं येतांच वेसण । वृषभ चाळे न करी कीं ॥ २३ ॥ मन हातीं आलियावरी । सुखें वर्तावें जगांतरीं । प्रत्येक पाय भूमीवरी ।

विचारोनि परी टाकावा ॥ २४ ॥ जैसें असेल आपुलें मन । तैसेच आपणा दिसती जन। चोर जारास संपूर्ण । लोक दिसती चोर जार ॥ २५ ॥ भोळ्यास भोळेचि भासती । संतास संताची दिसे रिती। खोट्यास सर्व खोटे वाटती । जाण नीती ही ऐशी ॥ २६ ॥ "सत्यापरता नाहीं धर्म । सत्य तेंचि परब्रह्म । सत्यापाशीं पुरुषोत्तम । सर्वकाळीं तिष्ठत ॥ १ ॥ असत्य तेंचि पै पातक । असत्य तोचि महा नरक । असत्याचे निःसंगें दुःख । अनंत जन्म भोगिती ॥ २ ॥ सत्यामृताची कनक वाटी । जोडिली न सांडे भूतटीं । असत्य विषाची नरोटी । पवित्र हातें नातळे ॥ ३ ॥" श्रीमुक्तेश्वराचे हे बोल । केवळ मौक्तिकांचे घोंस अमोल । मानोनियां कांचमणी फोल। दूर झुगारूं नको तूं ॥२७॥ हे अमूल्य मौक्तिकांचे सर । गुंफोनि पेंढें करी सुंदर । कंठीं घालितां मनोहर । करिवरगमने मज दिसशी ॥ २८ ॥ किंवा ही जडावाची ठुशी । कीं वज्रटीकचि भासे मशी । लोकीं अलंकार जे जे पाहशी । ते फिके दिसती यापुढें ॥ २९ ॥ ही मंगलाहूनी मंगल गळसरी । अखंड घालितां कंठांतरीं । कोणता अलंकार याची सरी । पावेल तें मज सांग ॥ ३० ॥ चंद्रहारादी अलंकार । व्यर्थ होय गळ्याशीं भार । दरोडा घालोनियां चोर । नेतील काय ही भीती ॥ ३१ ॥ सत्यालंकार नव्हे तैसा । मिरवे घालोनि दाही दिशा । असो दिवस अथवा निशा । भीती सहसा त्या नाहीं ॥ ३२ ॥ सत्यामृत राहतां तव ओठीं । तुच्छ तुजपुढें अप्सरा कोटी । त्रिभुवन-सुंदर रती गोमटी । परी तुच्छ मजप्रती सांगतों ॥ ३३ ॥ असत्य-नरकघाणी येतां मुखीं । सूज्ञ कोणता होईल सुखी । रत्न टाकोनी रत्नपारखी । लटिके कांच-मणी घेईल कां ॥ ३४ ॥ धरितां असत्याची कास । संसार्णव पार न जाशी खास । मजपासूनियांही सुख-लेश । प्राप्त निखालस न हो-

ईल ॥ ३५ ॥ तरी तव मुखकमला सत्या-मोद । येतांचि मज होईल मोद । मम मुख होऊनियां मिलिंद । रस अखंड सेवील ॥ ३६ ॥ आतां शालू सत्संगतीचा । तुज नेसवितों मी साचा । झोंक तुझिया पैठणीचा । पदर जरीचा व्यर्थ कीं ॥ ३७ ॥ आह्मीं कष्ट करितां अपार । मिळतील द्रव्याचे बहु भार । परी सत्संगतीचा थार । कोठें सहजी न सांपडे ॥ ३८ ॥ सत्संगती दुर्मिळ लोकीं । दगड पुष्कळ रत्नें थोडकीं । काक अगणित राजहंस कीं ॥ दृष्टीस कोठें न पडतीच ॥ ३९ ॥ मिळालीया सत्संगती । ती न सोडावी प्राणांतीं । सत्संगतीनें उत्तमागती । प्राप्त शेवटीं होईल ॥ ४० ॥ सत्संगतीनें ययाती तरला ॥ वक्रा कुब्जा जाहली सरला । वामदेव अंगस्पर्शें उद्धरिला । असूर देह दुर्जयाचा ॥ ४१ ॥ सत्संगतीचा महिमा अगाध । रेडा बोलिला चारी वेद । सत्संगतीनें शबरी प्रसिद्ध । सच्चिदानंद पद पावली ॥ ४२ ॥ सावित्रीसंगें सत्यवान । तरला असत्य ह्मणेल कोण । चित्रांगद राजा आयुष्यहीन । सीमंतिनीसंगें तरला कीं ॥ ४३ ॥ होतां नैधृवाची संगती । शारदेस लाधली उत्तमागती । शिवाजी जाहला थोर नृपती । रामदासाप्रती शरण जातां ॥ ४४ ॥ पुष्पसंगतीनें सूत्रास । घडे नरवरशिरीं वास । नाहीं तरी तयास । कोण विचारी हरि-मध्यें ॥ ४५ ॥ ऐशी थोर सत्संगती । जरी न मिळे आपणाप्रती । दुग्ध तृष्णा तक्रावरती । भागवावी गजगमने ॥ ४६ ॥ कारण दुधाचा कांहीं अंश । तक्रांत राहतो हें खास । परी जरी न मिळालें पायस । तरी काय सुरेस प्राशावें ॥ ४७ ॥ दुर्जनसंगती नरक घोर । तीपासोनि रहावें दूर । सहज ह्मणोनीहि क्षणभर । उभें तेथें नसावें ॥ ४८ ॥ ऐकतां मंथरेचा उपदेश । कैकईनें केला रामद्वेष । पदरीं न पडतां कीर्तीलेश । आलें अपयश कल्पवरी ॥ ४९ ॥ दाता शूर उदार कर्ण ।

दुर्योधनसंगें झाला दुर्जन । शूर्पनखेनें बोधितां दशानन । कुळा-
सहीत नष्ट झाला ॥ ५० ॥ आनंदीबाईची दुष्ट संगती । दैवें
लाधली दादाप्रती । लोकीं शूरवर ही प्रख्याती । परी कीर्तीची
माती झाली कीं ॥ ५१ ॥ कलुषा बिघडवी संभाजी । डेंगळ्यानें
रावबाजी ॥ हीं तों उदाहरणें ताजीं । डोळ्यांपुढें फिरतात॥५२॥
ढेंकुणासंगें नाशे हिरा । किंचित लवणें दुग्धडेरा । ह्मणोनि
दुर्जनाचा थारा । सहसाही न धरावा ॥ ५३ ॥ मम-हृदय-का-
सार-कुमुदिनी । सुहास्य-वदने हंसगामिनी । तव निटिलप्रदेशीं
रेखोनी । सत्सील कुंकुम लावी कां ॥ ५४ ॥ सौभाग्यतिलक हा
सुंदर । लावितां दिसशील मनोहर । मन्नेत्र होऊनियां चकोर ।
तव-मुख-शीतकर पाहतील ॥ ५५ ॥ सर्व धातूंत श्रेष्ठ सुवर्ण ।
कीं ग्रहांमाजी चंडकीर्ण । देवांत जैसा रमारमण । तैसें सद्गुणांत
सत्सील कीं ॥ ५६ ॥ अपार संपत्ती नांदे मंदिरीं । वाजी-गज
झूलती द्वारीं । सु-स्वभाव नाहीं जरी । तरी व्यर्थ संसारीं तें जिणें
॥ ५७ ॥ गृहीं नाहीं खावया अन्न । वस्त्र फाटकें अति जीर्ण ।
मात्र सत्सील असतां जन । मान देती आपणास ॥ ५८ ॥ नाना
विद्या नाना कला । शिकोनि विद्वन्मणी जाहला । जरी सत्सील
नाहीं त्याला । तरी तो आंचवला सु-कीर्तीस ॥ ५९ ॥ तुको-
बाची जिजाई भार्या । असत्सीलें गेली वायां । एवढा सत्संग
लाधोनियां । बुडविली काया तम-डोहीं ॥ ६० ॥ कबीरपत्नी
सत्सील बहुत । पुरवी पतीचे सर्व हेत । न उलंघीच आतां किं-
चीत । सर्व जगांत धन्य झाली ॥ ६१ ॥ मज आहे पूर्ण उमेद ।
धरोनि सत्सील देशील मोद । मग तुज मजमध्यें भेद । चारु-
गात्रे न राहील ॥ ६२ ॥ पातिव्रत्यचूडा अमोल । मम-मनरमणे
मनगटीं घाल । जडावाचीं कंकणें फोल । त्याजपुढें दिसतील
॥ ६३ ॥ अवाजी बावाजी तन्नकतारा । फेटा चटकचांदणीचा

नखरा । कोरट कचेरी प्रकार बरा । व्यर्थ पसारा हा होय॥६४॥ राणीचा बावटा डबल बिल्लोर । राजवर्खी चंद्रकोर । बिजलीची बत्ती मनोहर । सर्व असार यापुढें ॥ ६५ ॥ पोपटी नारिंगी केशरी । गजरे सुंदर वेणी कांच सारी । पातिव्रत्यचूड्याची सरी । एकही परी करीना ॥ ६६ ॥ द्रौपदी मंदोदरी सीता । अनुसूया पद्मिणी पतिव्रता । सावित्री सीमंतिणीच्या कथा । गोट पाटल्या ह्या घाल ॥ ६७ ॥ जन्मवरी एक पुरुष भोगितां । ती नव्हे खरी पतिव्रता । पातिव्रत्याची व्याख्या आतां । तुज निरोपिता मी होतों ॥ ६८ ॥ पतीवांचोनि इतर नर । पिता पुत्र कीं सहोदर । मदनासम जरी सुंदर । तरी कामेच्छेनें न पहावें त्या ॥ ६९ ॥ परपुरुषाशीं भाषण । प्रसंग आलिया करावें जाण । परी एकांतीं अथवा हास्यवदन । करोनि भाषण करूं नये ॥ ७० ॥ चौघांत बसला असतां पती । अथवा असतां एकांतीं । निष्ठुर भाषण त्याजप्रती । बोलोनि अपमान करूं नये ॥ ७१ ॥ अपराध असला प्राणसखयाचा । तरी कठोर वदों नये वाचा । मृदु मधुर बोलोनि त्याचा । अपराध त्याशीं दाखवावा ॥ ७२ ॥ मी आगळी शाहणी प्रियाहून । हा वाहूं नये अभिमान । तैसेंच स्वस्वरूपाचें गुमान । धरून अपमानूं नये त्या ॥ ७३ ॥ नेमस्त भाषण बोलावें । ऐकतां तयाचें चित्त डोलावें । एक तिळभरही न हालावें । तदाज्ञेवांचूनी सर्वथा ॥ ७४ ॥ आपुली कडी पतीवर । ठेवणें हा मूर्ख विचार । यायोगें अपमान फार । होतो जनांत पुरुषाचा ॥ ७५ ॥ तोरा मिरवितां पतीवरी । अपेशखापर फुटे शिरीं । कष्ट करोनीही नानापरी । होय बोहरी चहूंकडे ॥ ७६ ॥ प्रियकरास जे प्रियकर वस्त । तेथेंच आपण ठेवणें हेत । त्याविषयीं करितां विपरीत मात । व्यर्थ अनर्थ होतो कीं ॥ ७७ ॥ पती आज्ञा नसतां पाहीं । सहसा जाऊं नये परगृहीं ।

अपराध छपवावया ग्वाही । असत्य देऊं नयेची ॥ ७८ ॥ प-
तीस आवडे जो शृंगार । तोचि करावा निरंतर । सूज्ञ जीस म्ह-
णती छचोर । तैशी रहाटी ठेवूं नये ॥ ७९ ॥ पतीकारणें स्त्रि-
येचा देह । यांत कांहीं नसे संदेह । मग परांशीं पडावा मोह ।
ऐशी हांव कां धरावी ॥ ८० ॥ वारांगना आणि कुलवती ।
भिन्न भिन्न यांच्या रीती । परी सांप्रतही नीती । निराळी प्रचीती
दाविते ॥ ८१ ॥ एकांतांत पतीसवें । निःसंग होऊनि रमावें ।
परी परपुरुषाशीं अंग सखये । तिळभरही उघडें दिसूं नये ॥ ८२ ॥
सकोप जाहलीया भर्ता । चकार बोलों नये वार्ता । उत्तरास प्र-
तिउत्तर करितां । तरी अनर्था काय उणें ॥ ८३ ॥ सारांश आ-
पुला प्रियकर । केवळ मानुनियां ईश्वर । त्याची सेवा निरंतर ।
एकभावें करावी ॥ ८४ ॥ जप तप व्रत अनुष्ठान । सर्व पतिपद
सेवाचि जाण । पतीवांचूनि दैवत्य आन । चित्तीं आणूं नयेची
॥ ८५ ॥ येतां जातां उठतां बसतां । कार्य करितां देतां घेतां ।
गृहीं असो वा नसो भर्ता । छंद त्याचाच असावा ॥ ८६ ॥ अ-
वगुण ठेवोनियां मनीं । गुण तयाचे वर्णावे जनीं । आसनीं भो-
जनीं शयनीं स्वप्नीं । त्याचीच मूर्ती आठवावी ॥ ८७ ॥ गत
झालीया प्राणेश्वर । हाच कायम असावा विचार । यांत एकही
तिळभर । अंतर पडूं नये कीं ॥ ८८ ॥ त्याचीच मूर्ती करोनी
पाहीं । मनासहीत इंद्रियें दाही । तयाचे भजनीं सर्वदाही ।
तत्पर असावीं मनोरमे ॥ ८९ ॥ ऐशी वागेल जी वनिता । तीच
होय खरी पतिव्रता । उभयकुळांशीं तत्वता । पावन तीच करील
॥ ९० ॥ तिच्या दर्शनें इतर मानव । सहज तरतील भवार्णव ।
पशुपक्ष्यादी जड जीव । उद्धरोनी जातील ॥ ९१ ॥ पंचमहा-
भूतें सारीं । तिची आज्ञा वंदितील शिरीं । ब्रह्मा विष्णु त्रिपुरारी ।
नित्य दर्शन घेतील ॥ ९२ ॥ वर्णावया महिमा तिचा । असमर्थ

माझी वाचा । यांत अतिशयोक्तीचा । लेश नाहीं शशिवदने॥९३॥ केलें पतिव्रता-गुण-वर्णन । यांत काय आहे कठीण । मज साक्ष देतें माझें मन । कीं तूं ऐशी होशील ॥ ९४ ॥ मी आहें भाग्यहीन । खण घ्यावया नाहीं धन । नानाविध चिंध्या गोळा करून । कंचुकी देतों तुज आतां ॥ ९५ ॥ ईश्वरीं भाव ठेवावा । वडिलांस सदा मान द्यावा । प्रपंचीं परमार्थ साधावा । उभारावा कीर्तिध्वज ॥ ९६ ॥ होईल तितका परोपकार । संसारीं करावा निरंतर । परोपकारासम पुण्य थोर । नाहीं दुसरें या लोकीं॥९७॥ धन नाहीं जरी पदरीं । तरी देह झिझवावा परोपरी । सारांश कोणत्याही प्रकारीं । अन्योपकारीं रत व्हावें ॥ ९८ ॥ आपुले पोटाचा उद्योग । कोण नाहीं करित सांग । करोनिया स्वार्थत्याग । कार्य करी तोचि धन्य ॥ ९९ ॥ बोलणें बोलावें अति गोड । तरीच पुरती सर्व कोड । कोणाची बरी वाईट खोड । सहसा उच्चारूं नये कीं ॥ १०० ॥ आंत एक बाहेर एक । ऐसा भाव नसावा देख । आपुलें कर्म सुख दुःख । आपणाशीं देतसे ॥ १०१ ॥ काम केलिया परक्याचें । कधीं उच्चारूं नये वाचें । केले उपकार तयाचे । वागवावें स्वचित्तीं ॥ १०२ ॥ इष्ट मित्र आणि शेजारी । इतर संबंधी परके जरी । तरी तयांवरी प्रेम करी । सुहृदांहूनी आगळे ॥ १०३ ॥ तरीच लोकीं कीर्ती वाढे । ना तरी अकीर्ती पदरीं पडे । फट फजीती चोहोंकडे । होऊनि तरफडे जीव सदा ॥ १०४ ॥ ही सर्वोत्कृष्ट कांचोळी प्रेमभरें अंगीं घाली । जी जी वनिता हीस ल्याली । ती ती वली परम सुख ॥ १०५ ॥ आतां सुविचार घेवोनि जल । स्नान करोनी होईं निर्मळ । सत्संगशालू नेसोनि अमोल । सत्सीलकुंकुम लावीं कां ॥ १०६ ॥ व्यवहारनीतीची कंचुकी । घालोनि होईं तूं नेटकी । सत्यालंकार घालितां सुखी । कोण तुज-

ना-काव्य १०९



सम होईल ॥ १०७ ॥ पातिव्रत्यचूडा लेवोनी । येवोनि बैसें मम हृदयभुवनीं । मग ही स्वर्ग होईल अवनी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १०८ ॥ ( उपसंहार )—सत्पुरुषीं सद्बोधामृतसागर । सुजनासाठीं निर्मिला साचार । त्यांतील घेऊनि कूपिकाभर । तुज आणोनी दिधलें ॥ १०९ ॥ तींतील अमृत प्राशोनी । अमर होऊनि राहें जनीं । प्राशिलें असतां दिनरजनीं । लेशही उणें न होईल ॥ ११० ॥ हा उपदेशामृत अध्याय बरवा । नित्य याचा पाठ करावा । प्राणवल्लभे जिवाभावा- । पासोनि तुज मी सांगतों ॥ १११ ॥ हें पत्र नोहे केवळ अमृत । तुज पाजिलें मीं यथार्थ । माझे पूर्ण मनोरथ । करणें तुजकडे आहे कीं ॥ ११२ ॥ पतकी कुळांत माझें जनन । सोनाजीतनय नाम लक्ष्मण । राधा गृहिणी सुलक्षण । तिजशीं निरोपण हें केलें ॥ ११३ ॥ आणीकही देशभगिनी । त्यांनीं प्राशावें प्रेमेंकरोनी । धन्य धन्य होतील जनीं । संशय मनीं न ठेवावा ॥ ११४ ॥ हा उपदेश-वचन-सुमनहार । गुंफोनियां मनोहर । श्रीदत्तात्रय अनुसूयाकुमर । कंठीं त्याच्या घातला ॥ ११५ ॥

केवळ तुझाच प्रियकर—**लक्ष्मण सोनाजी पतकी.**

हेडमास्तर मराठी शाळा व्याळें ता० बाळापूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२८८